Vol 4 Issue 5 Nov 2014

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-5 | Nov-2014
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# *डॉ. द. ता. भोसले यांच्या कथेतील स्त्रीदर्शन*

*वंदना रामचंद्र पाटील*

***सारांश :-*** डॉ. द. ता. भोसले यांचे मराठी साहित्यामध्ये महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांनी विनोदी आणि गंभीर अशा दोन्ही स्वरूपाचे कथालेखन केलेले आहे. ग्रामीण जीवन, विविध प्रवृत्तीची माणसे, नातेसंबंध, ग्रामीण दोन्ही भागातील प्रथा, रूढी, परंपरा, कुटुंबपद्धती, बदलते ग्रामीण जीवन हे डॉ. द. ता. भोसले यांच्या लेखनातील महत्त्वाचे विषय आहेत. एक समर्थ कथाकार म्हणून त्यांनी विनोदी आणि गंभीर प्रवृत्तीचे कथालेखन केलेले आहे.

***प्रस्तावना:–***

### *1. सोलापूर भागातील स्त्री :*

डॉ. द. ता. भोसले हे मुळचे सरकोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील आहेत. सोलापूर हा पश्चिम महाराष्ट्रातील एक जिल्हा होय. शिक्षणाच्या माध्यमातून द. ता. भोसले यांनी पंढरपूर, सांगोला, सोलापूर, पुणे अशी भ्रमंती केली. ही भ्रमंती करत असतानाच त्यांच्या संवेदनशील मनाने ग्रामीण, दुष्काळी भागातील दारिद्र्यावस्थेमधून आलेले असल्यामुळे त्याचे चटके त्यांनी लहानपणापासूनच सहन केलेले होते.

अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करणारी सोलापूर स्त्री द. ता. भोसले यांच्या चित्रणांचा विषय बनते. ‘जन्म’ कथेतील कस्तुरा, ‘हिऱ्याची अंगठी’, कथेतील कात्यायनी, ‘आधार’ कथेतील धुरपा, सासरच्या लोकांनी त्रास दिल्यामुळे आत्महत्या करणारी सून ‘शोध’ कथेमध्ये भेटते. ‘मरणकळा’ कथेतील कस्तुरा, ‘पीळ’ कथेतील संपतरावांची पत्नी या सर्व जन्म कथासंग्रहातील स्त्री व्यक्तिरेखा मूलभूत गरजांसाठी संघर्ष करतात. पुरूषप्रधान व्यवस्थेचा त्या बळी ठरतात. त्यांच्या वैयक्तिक समस्या बाजूला ठेवून कुटुंबासाठी त्या ढोर मेहनत करतात. तरीही पुरूषप्रधान व्यवस्थेमध्ये त्या उपेक्षितच राहतात. या वंचिततेची, उपेक्षितपणाची दखल भोसले घेतात.

‘मनस्विनी’ हा द. ता. भोसले यांच्या स्त्री व्यक्तिरेख प्रधान कथासंग्रह. या संग्रहामधून त्यांनी सोलापूर भागातील स्त्री जीवन रेखाटले जाते. ‘मनस्विनी’ कथेतील देहविक्रय करणारी चंपा, ‘ओझे’ कथेतील गोकुळा फाटक्या तुटक्या संसाराचे ओझे पेलते आहे. ‘अन्नदान’ कथेतील चंद्रा आपल्याला कथेतील गोकुळा फाटक्या तुटक्या संसाराचे ओझे पेलते आहे. ‘मनस्विनी’ कथेतील चंद्रा आपल्याला बुंदी खायला मिळेल म्हणून गावातील माणसे चार चार दिवसाच्या अंतराने मरावीत अशी अपेक्षा व्यक्त करते. ‘पाणी’ कथेत दलित लोकांनी विहिरीवर पाणी भरल्यावर विहिर बाटेल म्हणून त्यांना पाणीही भरू दिले जात नाही. ‘सवाल’ कथेतील नर्मदेवर आत्याचार करणारा पाटील त्यानंतर तिला स्पर्श करण्याचे टाळतो. कारण नर्मदा दलित असते. त्यावेळी सवाल विचारणाऱ्या नर्मदासारख्या अनेक स्त्री व्यक्तिरेखांची प्रभावी चित्रणे द.ता.भोसले यांच्या कथांमधून येतात. ग्रामीण जीवनातील अत्राची समस्या, जातिव्यवस्थेची भिषणता यामुळे ग्रामीण भागातील स्त्री प्रचंड दबावाखाली जीवन जगते. तिच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या सर्वच वाटा पुरूषी व्यवस्थेने बंद करून टाकलेल्या आहेत. या दाहक वास्तवाची नोंद द. ता. भोसले करतात.

ग्रामीण भागातील स्त्री ही पुरूषप्रधान व्यवस्थेच्या वर्चस्वाखाली चिरडली जाते. त्यावेळी शहरी भागातील स्त्री मात्र शिक्षणाच्या बळावर समर्थपणे वाटचाल करताना दिसते. ‘मूकनायिका’ (मनस्विनी) कथेतील चंपा,

'दोघी' (मनस्विनी) कथेतील कावेरी आणि पद्मा या स्त्री व्यक्तिरेखा शिक्षित आहेत. त्यामुळे दैन्य, दारिद्र्य, बेकारी, उपासमार, यांपासून, त्यांची सुटका होते परंतु त्यांची वैचारिक भूक मात्र या व्यवस्थेमध्ये भागवली जात नाही.

ग्रामीण भागातील, शहरी भागातील, तसेच झोपडपट्टीतील स्त्री व्यक्तिरेखा द. ता. भोसले यांच्या लेखनाचा विषय होतात. या स्त्री व्यक्तिरेख फक्त सोलापूर भागातीलच आहेत किंवा त्यांचे प्रश्न त्या भागापुरतेच मर्यादित आहेत असे नव्हे, तर समग्र पुरूषप्रधान व्यवस्थेतील स्त्रीला मिळणारी दुय्यमपणाची वागणूक ही कोणत्याही प्रदेशामध्ये एकसारखीच आहे या दाहक वास्तवाची जाणीव द. ता. भोसले यांच्या कथा करून देतात. गंभीर कथालेखनामधून स्त्रियांच्या समस्यांची मांडणी भोसले करतात. त्या तुलनेमध्ये विनोदी कथा मनोरंजनाकडे झुकताना दिसतात. परंतु त्या कथाही स्त्रियांच्या समस्यांना टाळत नाहीत. स्त्री दुःखाला विनोदी कथाही वाचा फोडतात.

एकूणच सोलापूर भागातील स्त्री ही कष्टकरी आहे. कष्टाच्या श्रमाच्या बळावर ती आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाह करते. वैयक्तिक हितापेक्षा कुटुंबहित महत्वाचे मानणारी ही स्त्री आहे. त्यामुळे कुटुंबासाठी ती त्याग करते. पती व्यसनाधिन असला किंवा अपंग असला तरी ती पतीला, नशीबाला दोष देत बसत नाही. पोटी व्यसनाधिन असला किंवा अपंग असला तरी ती पतीला, नशीबाला दोष देत बसत नाही. पोटी जन्मला आलेल्या मुला मुलींना घासभर अन्न कसे मिळेल या विवंचनेमध्ये ती वावरत असते. हे अन्न मिळविण्यासाठी जे कष्ट करावे लागतील ते कष्ट ती आनंदाने करते. 'पाळत', 'अगं अगं म्हशी' आणि 'खसखशीचा मळा' हे द.ता. भोसले यांचे तीन विनोदी कथासंग्रह होय. या संग्रहातून स्त्री पात्रांचे विविधांगी चित्रण द. ता. भोसले करतात. विनोदी कथासंग्रातील स्त्रिया मनमोकळेपणाने बोलत असल्या तरी त्यांच्या अंतरंगामध्ये दुःखाची सल आहे. संसार करत असतांना अनेक मानहानीचे वागणूक विनोदी कथांमधूनही प्रत्ययास येते. स्त्रियांच्या जीवनातील दुःखी वातावरण विनोदी शैलीत मांडल्यामुळे दुःखाची धार बोथट होते. त्यामुळे वेदनेचा सुर गडद स्वरूप धारण करत नाही.

षाळतष कथासंग्रहातील 'करामत' कथेतील विधवा किष्णाबाई, 'हट्ट' कथेतील विधवा तारामती या व्यक्तिरेखा विनोदी कथेतील असल्या तरी त्या गंभीर स्वरूप धारण करतात. विधवा किष्णाबाई विधवापणातही नैतिकता सांभाळते. आपल्या चारित्र्याला जपते. परपुरूषाने मोहात पाडण्याचा प्रयत्न केला तरी ती स्वतःची सोडवणूक करून घेते. 'हट्ट' कथेतील तारामतीचा पती राणू तिला कायमचा सोडून जातो. तेव्हा विधवा तारामतीपुढे सदा आणि नर्मदा या दोन मुलांना सांभाळण्याचा यक्ष प्रश्न उभा राहतो.

'पाळत' कथेतील तारामावशी तान्याची रखेल म्हणून राहते. 'बाबा गोष्ट सांगा' कथेतील बबडीची आई बाबावरती रूबाब गाजवते. 'लगीन नको गं बाई' कथेतील पाटलीणबाई व्यवहारी आहे. 'मी भाषणाला जातो', 'प्रवासातील सोबत', 'लाल त्रिकोन' कथेतील स्त्रिया यशोदाकाकू, देशमुखीणबाई, वत्सलाबाई, पोटफोडेबाई, वस्तलाकाकू या सुशिक्षित आहेत. त्यामुळे भाषण करणे, समाजोपयोगी कार्यक्रमामध्ये सहभागी होणे, प्रवासामध्ये पुरूषांची भंबेरी उडवणे ही कामे या व्यक्तिरेखा करताना दिसतात. या स्त्रिया आत्मविश्वासाने समाजामध्ये वावरतात. आनंदी जीवन जगतात.

'अगं अगं म्हशी' हा कथासंग्रह ही विनोदी स्वरूपाचा आहे. या मधील 'अगं अगं म्हशी' कथेतील बायजाचे पती गेनाबरोबर भांडण होते. गेना पुरूषप्रधानतेमुळे बायकोने आपल्याला शरण यावे अषी अपेक्षा धरतो. परंतु बायजाही गेनाला अद्दल घडविण्यासाठी बोलत नाही. जेवण देत नाही. 'प्रौढ शिक्षण' कथेतील शेवंता कोलाटीण अनैतिक वर्तन करते. 'दुःख' कथेतील विधवा कौसल्येचे दुःख, 'कथा ही अंत्यसंस्काराची' मधील सिदूच्या बायकोचे दुःख अस्वस्थ करणारे आहे. 'बाबुराव न्हावी' कथेतील कोलाट्याची पारू, 'वरात' कथेतील भिका नरसाळेची बायको व 'लढत' कथेतील सौ. तडतडे या तीनही स्त्री व्यक्तिरेखा विनोद निर्मितीसाठी कथेमध्ये येतात. या स्त्रियांचे चावट वर्तन, वजनदार शरीरयष्टी व बडबड करण्याची प्रवृत्ती या माध्यमातून विनोद निर्माण केला जातो.

'खसखशीचा मळा' हा द. ता. भोसले यांचा विनोदी कथासंग्रह आहे. या कथासंग्रहातील सर्वच कथांमध्ये येणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा या गौण आहेत. पुरूष व्यक्तिरेखा या प्राधान्याने म्हणून येतात. त्यामुळे स्त्री विषयक चित्रणाला गौण स्थान लाभलेले आहे. पतीबरोबर संघर्ष व त्यातून होणारी विनोद निर्मिती हे एक सूत्र या विनोदी कथांच्या पाठीमागे असलेले दिसून येते.

एकूणच या तीन विनोदी कथासंग्रहामधील स्त्री व्यक्तिरेखांचा एकत्रित विचार करता असे दिसून येते की, यातील बऱ्याच स्त्री पात्रांच्या वाट्याला दुःखच जास्त येते. विधवापणाचे दुःख, वांझपणाचे दुःख, उपासमारीचे दुःख या स्त्रिया सहन करतात. विनोदी कथेतील स्त्रिया या संसारी जीवन जगणाऱ्या आहेत. त्यातील काही

आनंदी, समाधानी आहेत. तर काही दुःखी आहेत. काही स्त्रिया संयमाने स्वतःला व्याभिचारापासून रोखतात. तर काही स्त्रिया स्वतःहून तो मार्ग पत्करतात. बहुतांश कथांमध्ये स्त्री व्यक्तिरेखांना गौण महत्त्व दिलेले आहे. निवडक कथांमध्येच स्त्रियांना प्राधान्य लाभलेले आहे.

### *3. पुरूषप्रधान समाजातील स्त्री*

भारतीय समाजव्यवस्था पुरूषप्रधान स्वरूपाची आहे. त्यामुळे जन्मापासूनच स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. लग्नानंतर तर स्त्रियांचे शारीरिक, मानसिक शोषण मोठ्या प्रमाणावर केले जाते. लग्न होऊन नांदायला येणारी स्त्री म्हणजे एक कामगारच आहे अशी पुरूषवर्गाची धारणा बनते. असेच संस्कार लहानपणापासून पुरूषांवर झालेले असतात. त्यामुळे पुरूष स्त्रीला माणूस म्हणून न वागवता नोकर, कामगार म्हणूनच वागवतो. कुटुंबातील सारे कष्ट करून स्त्रीने शेतातील म्हणून न वागवता नोकर, कामगार म्हणूनच वागवतो. कुटुंबातील सारे कष्ट करून स्त्रीने षेतातील कामे केली पाहिजेत. शेती नसेल तर रोजंदारीवर जाऊन तिने कुटुंबाचा गाडा हाकला पाहिजे. कुटुंबातील साऱ्या मुलाला जगविण्याची व पतीला पोसण्याची जबाबदारीही स्त्रीवर येऊन पडते. अर्थात कुटुंबाचा गाडा स्त्री व पुरूष दोघांना मिळून हाकला तर तो व्यवस्थित चालतो. परंतु पुरूश जेव्हा स्वतःला या संसाराच्या रहाटगाड्यातून वगळतो तेव्हा कुटुंबाची सारी जबाबदारी स्त्रीवर येऊन पडते. तिला संसारापासून दूर होता येत नाही. पुरूषप्रधान व्यवस्था तिला असे स्वातंत्र्य देत नाही. पर्यायाने या व्यवस्थेतील स्त्री शोषणाची शोषणाची बळी ठरते.

द. ता. भोसले यांच्या अनेक कथांमध्ये येणारे पुरूष हे पुरूषी वर्चस्वव्यवस्था मानणारे आहेत. त्यामुळे स्वतःच्या आळशीपणाचे, ऐतखाऊ प्रवृत्तीचे ते समर्थनच करतात. स्त्रीनेच कुटुंबाचा गाडा हाकला पाहिजे. रोजंदारीवर कामाला जाऊन आलेले पैसे नवऱ्याच्या हातात दिले पाहिजेत. नवऱ्याला दारू पिण्यासाठी मागितले तर ते त्याला वेळेवर दिले पाहिजेत नाही तर नवऱ्याची मारहाण तिने सहन केली पाहिजे. अशी ही पुरूषप्रधान व्यवस्था आहे. या पुरूषप्रधान व्यवस्थेमुळे स्त्रियांना आश्रू गाळण्याशिवाय पर्याय राहत नाही. षात्र्ष ;अन्नद्ध कथेतील काशी मोलमजूरी करून घरी येते. तेव्हा पती दामा दारू पिण्यासाठी पैसे मागतो. काशी नकार देते तेव्हा तो तिला बेदम मारहाण करतो. पैसे नाहीत तर मग पीठ तरी दे असा त्याचा अट्टाहास असतो. पीठ विकून त्याला दारू प्यायची असते. दामाच्या या वर्तनामुळे काशीला दुःखाला सामोरे जावे लागते.

'मोबदला' (अन्न) कथेतील उच्चभ्रू तरूण भिक मागण्यासाठी येणाऱ्या भिकारणीवर अत्याचार करतो व स्वतःची वासनेची भूक भागवतो. पैशाच्या बळावर तो हे सुख ओरबाडून घेतो. पुरूषप्रधान समाजातील स्त्रीला बलात्काराला सामोरे जावे लागते. 'बाजार' (पाऊस) कथेतील चंपा ही देसाईच्या वासनेची शिकार बनते. या प्रसंगामुळे मनातून उध्वस्त होते. तिच्या मनाचा कोंडमारा होतो. कारण हे दुःख कोणालाही सांगता येण्यासारखे नसते. हुंदक्यावर हुंदके देऊन चंपा आपल्या दुःखाला मोकळी वाट करून देते. पुरूषप्रधानतेमुळे स्त्रियांना मुस्कटदाबी सहन करावी लागते. झालेल्या अत्याचाराविरूध्द आवाजही उठवता येत नाही. 'मनस्विनी' कथेतील चंदा ही जोगतिणीची नवरा तिला एक महिन्यामध्येच सोडून देतो. कारण त्याचा बायकोवर वासनेची शिकार बसते. लग्नानंतर तिचा नवरा तिला एका महिन्यामध्येच सोडून देतो. कारण त्याचा बायकोवर विश्वास नसतो. पुरूषप्रधान व्यवस्थेमुळे स्त्रीचे स्वातंत्र्यच हिरावून घेतले जाते. स्त्रीकडे माणूस म्हणून न पाहता वस्तू म्हणून पाहिले जाते व वस्तूप्रमाणेच तिच्याशी वर्तन केले जाते. तिच्या सुख–दुःखाचा, भाव–भावनांचा विचार केला जात नाही.

'ओझे' कथेतील गोकुळा, 'प्रकाशपावले' कथेतील गोदा गुरवीण, 'अन्नदान' कथेतील आनसा या स्त्रियांना स्वतः कष्ट करून पोसावे लागते. तरीही त्यांना वैचारिक स्वातंत्र्य नाही. कष्ट करूनही काशीला मारहाण सहन करावी लागते. 'मोबदला' कथेतील भिकारणीची आब्रू लुटली जाते. 'बाजार' कथेतील चंपा, 'मनस्विनी' कथेतील चंदा, 'व्यवस्थित' कथेतील रघूची आई अत्याचाराला बळी पडतात.

एकूणच पुरूषप्रधान व्यवस्थेतील स्त्रीला मारहाण केली जाते. तिची आब्रू लुटली जाते. तिला कायम उपेक्षित ठेवले जाते. कोणत्याही पातळीवरचे स्वातंत्र्य नाकारले जाते. या स्त्रीला मानहाणीचे जीवन जगावे लागते.

### *4. शिक्षणक्षेत्रात आलेल्या स्त्रिया :*

द. ता. भोसले यांनी ग्रामीण आणि शहरी स्त्रियांचे जीवन चित्रण रेखाटले आहे. ग्रामीण स्त्री अनेक समस्यांनी त्रस्त आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, बेरोजगारी, उपासमार, पोराबाळांचे लेंढार, अकर्तृत्वान नवरा, नवऱ्याची व्यसनाधिनता व मारहाण, समाजातील पुरूषांकडून निराधार स्त्रियांवरती, विधवा स्त्रियांवरती होणारे अत्याचार या

समस्यांना त्यांना दररोज तोंड लागते. ग्रामीण स्त्रियांच्या तुलनेत शहरी स्त्रियाचे जीवनमान सुखाचे, समाधानाचे व आनंदाचे राहते. शिक्षणामुळे स्त्रियांच्या जीवनात प्रकाश आलेला असतो. नोकरी करून या स्त्रिया स्वतःची व कुटुंबाची गुजरण करतात. अशा शिक्षणक्षेत्रातील शहरी स्त्रियांची चित्रणे द. ता. भोसले यांनी केलेली आहेत.

'याचे नाव कायदा' ( 'अन्न') कथेतील स्वातंत्र्यसैनिकांची विधवा पत्नी पुण्यातील एका फ्लॅटमध्ये राहते. बाई शाळेत शिक्षकेची नोकरी करत असल्यामुळे मुलगा व ती समाधानाने राहतात. मुलाचे मुंबई येथील मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षण चालू असते. शिक्षण चालू असतानाच दिवाळी सुटीसाठी तो पुण्याला परतत असताना रेल्वेमधून पडून मृत्यू होतो. या घटनेने बाईचे जीवन विस्कटून जाते. त्यांना वेड लागते. 'मूकनायिका' ('मनस्विनी') कथेतील पद्माचे बी. ए. पर्यंत शिक्षण झालेले असते. या शिक्षणामुळेच इंजिनियर असलेल्या तरूणाबरोबर तिचे लग्न होते. तिचे स्वतंत्र असे व्यक्तिमत्त्वाला अनेक मर्यादा पडतात. पद्माचा मानसिक कोंडमारा होतो. 'दोघी' ( 'मनस्विनी') ही कथा पद्मा व कावेरी या दोन मैत्रिणींच्या जीवनचरित्रावर आधारलेली आहे. दोघीही कॉलेज जीवनापासूनच्या जीवलग मैत्रिणी. लग्नानंतर त्यांची ताटातूट होते, परंतु दोघीही संसारामध्ये समाधानी आहेत, आनंदी आहेत. हे शिक्षणाचेच यश आहे. पद्माला श्रीमंताचा गर्व व अभिमान असतो. त्याप्रमाणे तिची अपेक्षा पूर्ण होते. कावेरीला पैशापेक्षा सामाजिक सेवा महत्त्वाची वाटते. ती अनाथाश्रमातील मुलांसाठी काम करते. पतीही तिच्यासोबत आहे. दोघीही वेगवेगळी जीवनशैली जगत असल्या तरी त्यामध्ये त्या समाधानी आहेत.

'पीळ' ( 'जन्म') कथेतील संपतरावाची बायको शहरी वातावरणामध्ये वाढलेली आहे. त्यामुळे तिला ग्रामीण वातावरणाची किळस वाटते. गावातील लोकांचा ती तिरस्कार करते. संपतरावाचे आई वडिल कार्यक्रमाच्या निमित्ताने शहरात संपतरावाकडे येतात. तेंव्हा संपतरावाची बायको त्यांचा पाणउतारा करून त्यांना गावाकडे हाकलून देते. संपतरावाची बायको शिक्षत आहे, परंतु सुसंस्कृत नाही. 'बाबा गोष्ट सांगा' ( 'पाळत') कथेतील बंड्या आणि बबडीची आई मध्यमवर्गीय पांढरपेशा कुटुंबातील गृहिणी आहे. ती शिक्षित आहे. नोकरी करणाऱ्या नवऱ्यावर ती रूबाब गाजवते. 'प्रवासातील सोबत' ( 'पाळत') कथेतील 'ती' शिक्षित आहे. त्याचबरोबर सबला आहे त्यामुळे एकटीच प्रवास करीत असताना तिला कुणाही पुरूषाची आधारासाठी गरज वाटत नाही. पुरूषाकडून काही गैरवर्तन घडल्यास त्यास ती शब्दाने व कृतीने सडेतोड उत्तर देते. ष्मी भाषणाला जातो' ( 'पाळत') कथेतील 'ती' प्राध्यापकाची बायको आहे. तिच्या मैत्रीणी यशोदाकाकू, देशमुखबाई, वत्सलाबाई यांची व्याख्याने ऐकून ती प्राध्यापकाला व्याख्यान देण्यास प्रेरित करते. 'लाल त्रिकोण' कथेतील वत्सलाकाकू खेड्यापाड्यात, शेतात, वस्तीवर जाऊन कुटुंब नियोजनाचे उर्मी त्यांच्या मनामध्ये निर्माण होते.

एकूणच 'याचे नाव कायदा' , 'दोघी' , 'पीळ' , 'बाबा गोष्ट सांगा' , 'प्रवासातील सोबत' , 'मी भाषणाला जातो' ,'लाल त्रिकोण' , इ कथांमधून शिक्षण क्षेत्रातील स्त्रियांचे चित्रण द. ता. भोसले यांनी केले आहे. या स्त्रिया जेवढ्या संवेदशील आहेत तेवढ्या संवेदनाशुन्य जीवन जगणाऱ्या आहेत. त्यांचे प्रश्न, समस्या तरी त्या पेल्यातील वादळ ठरावे इथपर्यंतच मर्यादित आहे. एकूणच शिक्षित स्त्रिया या आनंदी, समाधानी जीवन जगणाऱ्या आहेत. त्यांना एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये घुसमटलेपण सहन करावे लागते. त्यांच्या वैचारीक स्वातंत्र्यावर व वैयक्तिक जीवनावर एकत्र कुटुंबपद्धतीमुळे बऱ्याच मर्यादा पडतात. म्हणून या स्त्रिया विभक्त कुटुंबपद्धतीचा पुरस्कार करणाऱ्या आहेत. कौटुंबिक बांधिलकी त्या मानत नाहीत.

### *5. झोपडपट्टीतील स्त्री जीवन :*

द. ता. भोसले यांच्या कथालेखनामध्ये वैविध्य आहे. त्यांनी ग्रामीण, शहरी जीवनातील स्त्रियांचे चित्रण केले त्याचप्रमाणेच झोपडपट्टीतील स्त्रियांच्याही जीवनाचे वेधक चित्रण केले आहे. 'मोबदला' ( अन्न) कथेमध्ये झोपडपट्टीतील तरूण भिकारणीचे चित्रण येते. दारोदार भीक मागून ही भिकारीण स्वतःची व लहान बाळाची भूक भागवते आहे. भीक मागणे हेच तिचे उदरनिर्वाहाचे साधन असते. दोन दिवस उपाशी असताना ती भीक मागत उच्चभ्रू सोसायटीमध्ये येते. तेव्हा तेथील विलासीजीवन जगणारा भोगवादी मानसिकतेचा तरूण तिच्यावर अतिप्रसंग करतो. त्यावेळी ती त्याला विरोध करत नाही किंवा अकांडतांडवही करीत नाही. कारण अब्रूपेक्षा तिला भाकरी महत्त्वाची वाटते. त्या तरूणाने तिची आब्रू लुटली, त्या मोबदल्यामध्ये त्याने तिला पोटभर जेवण द्यावे एवढीच तिची माफक अपेक्षा आहे. 'अन्नाची भूक चेतली तर ती सर्वच गोष्टींचा, नैतिकतेचा त्याग करायला तयार होते.' हे या उदाहरणावरून दिसून येते. त्याचबरोबर झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या व भिक मागून उदरनिर्वाह करणाऱ्या स्त्रियांच्या जीवनातील दाहकता या कथेमधून द. ता. भोसले अधोरेखीत करतात.

'किंमत' (अन्न) कथेतील रखमा पती ईश्वरसोबत झोपडपट्टीमध्ये राहत असते. खेडेगावामध्ये रोजगार

मिळत नाही म्हणून गाव सोडून हे कुटुंब शहरातील झोपडपट्टीमध्ये येवून वास्तव्य करते. परंतू शहरातही सतत पडणाऱ्या पावसामुळे त्यांना कुठेही काम मिळत नाही. अशातच मुलगा तापाने आजारी पडतो. घरातील भांडे विकून जगण्याची वेळ त्यांच्यावर येते. उपासमारीने ते हैराण होतात. औषधोपचारासाठी जवळ पैसे नसल्यामुळे उपचाराअभावी त्यांचा मुलगा मरण पावतो. त्याचवेळी त्याच्या अंत्यविधीसाठी लागणारे पैसेही या कुटुंबाकडे नसतात. अश्रू गाळत दोघेही बसलेले असतानाच महारोगाने पिडलेली बाई भिक मागण्यासाठी मेलेले मुल पाच रूप्याला विकत मागते. कारण तिच्यावरही उपासमारीची वेळ आलेली असते. मेलेलं मूल पाहून कुणीही भीक देईल अषी तिची अपेक्षा असते. झोपडपट्टीतील मन सुन्न करणारे विदारक सत्य 'किंमत' या कथेमधून द.ता. भोसले चित्रित करतात. प्रचंड दारिद्र्य, उपासमार, गलिच्छ वातावरण, रोगराई, आस्मानी संकटे यांना झोपडपट्टीतील स्त्रियांना सामोरे जावे लागते.

'रात्र' (अन्न) कथेतील काशी नवरा दामासोबत झोपडपट्टीमध्ये राहतात. पोटामध्ये मूल वाढत असूनही ती दररोज मोलमजूरी करते व त्यावर कुटुंबाची गुजराण चालते. पती दामा आळशी व व्यवनी आहे. तो काहीही काम करत नाही. उलट संध्याकाळी काशीकडे दारूसाठी पैसे मागतो. तिने पैसे दिले नाही तर तिला मारहाण करतो. घरामध्ये सर्वत्र पीठ पसरून टाकतो. सारी रात्र काशीला अश्रू गाळत काढावी लागते. स्वतःसाठी नाही परंतू पोटामध्ये वाढणाऱ्या बाळासाठी तिला अन्नाची गरज आहे. कष्टाने मिळविलेले अन्नही तिचा नवरा सुखाने तिला खाऊ देत नाही. शारीरिक शोषणाबरोबरच काशी मानसिक शोषणाचाही बळी ठरते.

'अन्नदान' ('मनस्विनी') कथेतील आनसाचा नवरा लंगडा आहे. तीन मुलं व नवऱ्यासोबत ती झोपडपट्टीमध्ये राहते. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी तिच्यावर असते. परंतु एकटीच्या रोजगारामुळे कुटुंबाला अर्धपोटी रहावे लागते. 'मरणकळा' ('जन्म') कथेतील कस्तुतरा डोंबारणीला तर मृत्यूनंतर मोठी अवहेलना सहन करावी लागते. डोंबारी ही फिरस्ती जमात. गावामध्ये तात्पूरत्या स्वरूपाची पालं टाकून दिवसीर खेळ करून उदर निर्वाह करणारी ही जमात. पावसाळ्यामध्ये वृद्ध व थकलेली कस्तुरा डोंबारीण मृत्यू पडते तेंव्हा गावातील कोणताच समाज अंत्यविधीसाठी डोंबाऱ्यांना स्मशानभूमी उपलब्ध करून देत नाही. पाऊस तर संततधार सुरू असतो. त्यामुळे प्रेत दुसऱ्यागावी घेऊन जाणेही अशक्य बनते. जिवंतपणी ज्या यातना कराव्या लागतात त्यापेक्षा यातना कस्तुराला सहन कराव्या लागतात.

एकूणच झोपडपट्टीतील स्त्रीचा संघर्ष हा केवळ जगण्यासाठी चाललेला संघर्ष आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांपासून ती दूर आहे. त्यामुळे स्वाभिमान, अभिमान गहान ठेवून लाचारीने तिला जगावे लागते. परिस्थितीने ती एवढी अगतिक बनली आहे की कुटुंबाचा गाडा चालवायचा कसा हा तिच्यापुढे महत्त्वाचा प्रश्न आहे. पतीची मारहाण सहन करत ती मोलमजूरी करते आहे. परंतू सतत पडणाऱ्या पावसामुळे तिला कामही मिळत नाही. त्यावेळी तिला उपासमारीला सामोरे जावे लागते. जगण्यासाठी चाललेली धडपड संकटांची साखळी त्यामुळे निर्माण झालेले दुःख या स्त्रियांना भोगावे लागते. व्यसनी पतीमुळे तर तिच्या शोषणामध्ये अधिकच भर पडते.

***समारोप***

एकंदरीत डॉ. द.ता. भोसले यांनी ग्रामीण भागातील स्त्रियांच्या चित्रणासाठी सोलापूर परिसरातील स्त्रिया नजरेसमोर ठेवलेल्या दिसतात. त्यामध्ये विविधताही असते. त्या गरीबीत जीवन जगणाऱ्या, झोपडीत आयुष्य काढणाऱ्या, पुरूषांच्या जाचात संसार करणाऱ्या, नोकरी करणाऱ्या आणि सर्व वयोगटातील, समाजाच्या सर्व घटकांतील आहेत.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org